महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. पवन २००४/प्र.क्र. १२७४/ऊर्जा-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २६ फेब्रुवारी,२००४.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत मंत्रालयातर्फे अपारंपारिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याचे धोरण आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही अपारंपारिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले आहे.

अपारंपारिक ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली व पवन ऊर्जा प्राद्यौगिक केंद्र (C-WET), चेन्नई यांच्या मदतीने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने (महाऊर्जा) राज्यात आजमितीस एकूण २८पवन ऊर्जा निर्मितीक्षम स्थळे शोधून ती निश्चित केली आहेत. या स्थळांमधून एकूण ३६५० मे. वॉ. इतकी पवन ऊर्जा निर्मिती होऊ शकते.

पवन ऊर्जेचे दीर्घकालिन फायदे लक्षात घेता पवन ऊर्जा निर्मिती प्रकल्प आर्थिकदृष्टया सुसाध्य व्हावेत म्हणून सुरुवातीच्या काळात पवन ऊर्जा प्रकल्पांना स्वस्त कर्जे, हरित ऊर्जा सहाय्य, कर सवलती किंवा आर्थिक मदत आणि पारंपारिक ऊर्जा स्त्रोतावर कार्बन कर लावून निधी ऊभारुन सहाय्य दिले जाते. राज्याचे पहिले पवन ऊर्जा धोरण दिनांक ३१.३.२००२ पर्यन्त अस्तित्वात होते. पवन ऊर्जा उद्योगांची सद्यःस्थिती, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पवन ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणा-या वीजेच्या दराबाबत दिलेला आदेश इत्यादी लक्षात घेऊन शासनाने पुढीलप्रमाणे धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

**१) पवन ऊर्जा निर्मितीक्षम स्थळे :-** राज्यात पवन ऊर्जा निर्मितीक्षम अशी २८ स्थळे महाऊर्जाने निश्चित केली असून नवीन पवन ऊर्जा धोरणाव्दारे २००७ पर्यंत तेथून ७५० मे. वॉ. क्षमता कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी महाऊर्जा प्रकल्पांच्या स्थळांचा तांत्रिक व आर्थिकदृष्टया अभ्यास करुन विकसित करावयाच्या स्थळांचा बृहत आराखडा शासनास सादर करील. असा आराखडा शासन मान्यतेनंतर महाऊर्जातर्फे स्वतंत्रपणे निर्गमित केला जाईल.

**२) मूलभूत सुविधा :-** मूलभूत सुविधांमध्ये प्रामुख्याने प्रकल्प स्थळांपर्यन्त पोहोच रस्ते तयार करणे, विजेच्या निष्कासनासाठी आवश्यक असलेल्या पारेषण वाहिन्यांची उभारणी व उपकेंद्रें स्थापित करणे या बाबींचा समावेश आहे. वरील १ मध्ये उल्लेखिलेल्या आराखडयानुसार विकसित करावयाच्या नियोजित स्थळांवर मूलभूत सुविधांच्या विकासाच्या नियोजनाचे प्रकल्प अहवाल महाऊर्जा, निष्कासन व्यवस्थेसाठी म.रा.वि.मंडळ

आणि पोहच रस्त्यांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या सल्ल्यानुसार अंदाजित किंमतीसह तयार करुन शासनास मान्यतेसाठी सादर करील.

**३) हरित ऊर्जा निधी :-** अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांच्या विकासाकरिता राज्यातील वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांवर अधिभार लावून हरित ऊर्जा निधी स्थापन करण्यात येईल. निधीचा उपयोग राज्यातील अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या विकासासाठी आवश्यक असणा-या पायाभूत सुविधांसाठी करण्यात येईल. हरित ऊर्जा निधीच्या व्यवस्थापनाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

**४) निष्कासन व्यवस्था :-** प्रकल्पासाठी लागणा-या उच्च दाब आणि अति उच्च दाब केंद्रांचे व त्यांना लागणा-या पारेषण व वितरण वाहिन्यांचे सर्वेक्षण म.रा.वि.मंडळ व महाऊर्जा संयुक्तपणे करतील. सर्वेक्षणाप्रमाणे उभारण्यात येणारी उच्च दाब व अतिउच्च दाब उपकेंद्रे व त्यांना लागणा-या अतिउच्च दाबाच्या पारेषण व वितरण वाहिन्यांची कामे महाऊर्जा किंवा खाजगी पवन ऊर्जा प्रवर्तक, म.रा.वि.मंडळाने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार व म.रा.वि.मंडळाच्या तांत्रिक प्रमाणानुसार (Technical Specifications) म.रा.वि.मंडळाच्या देखरेखीखाली करुन घेतील. या निष्कासन व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेली उपकेंद्रे आणि पारेषण व वितरण वाहिन्यांमध्ये जे काही सुदृढीकरण अथवा बदल करावे लागतील त्यांचाही समावेश असेल. पवन ऊर्जा प्रकल्पांच्या ठिकाणांपासून ते उच्च दाब व अति उच्च दाब उपकेंद्रांपर्यन्त जोडल्या जाणा-या ३३ के.व्ही. दाबाच्या वाहिन्यांचाही समावेश या व्यवस्थेमध्ये असेल. वरील सर्व कामांसाठी लागणा-या निधीच्या ५० टक्के रक्कम हरित ऊर्जा निधीमधून अनुदान म्हणून उपलब्ध करुन दिली जाईल व ५० टक्के रक्कम बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात देण्यात येईल.

खाजगी प्रवर्तकांनी स्वखर्चाने उभारुन कार्यान्वित केलेल्या निष्कासन व्यवस्थेच्या खर्चाची परतफेड, निष्कासन व्यवस्था कार्यान्वित होऊन पूर्णत: म.रा.वि.मंडळाकडे हस्तांतरित झाल्यावर महाऊर्जाकडून खाजगी प्रवर्तकाला करण्यात येईल. खाजगी प्रवर्तकाला परतफेड करावयाच्या रकमेची कमाल मर्यादा ही म.रा.वि.मंडळाच्या अंदाजपत्रका एवढीच असेल व या रकमेचा परतावा महाऊर्जातर्फे हरित ऊर्जा निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

निष्कासन व्यवस्था कार्यान्वित झाल्यानंतर ती म.रा.वि.मंडळाकडे हस्तांतरित करण्यात येईल व याच बरोबर ५० टक्के बिनव्याजी कर्जाच्या परतफेडीचे दायित्व देखील म.रा.वि.मंडळाकडे राहील.

निष्कासन व्यवस्थेच्या खर्चापोटी ५० टक्के बिनव्याजी कर्जाच्या रक्कमेची परतफेड म.रा.वि.मंडळ निष्कासन व्यवस्था कार्यान्वित झाल्याच्या दिनांकानंतर एका वर्षाने सुरु होणा-या पाच वर्षाच्या कालावधीत पाच समान वार्षिक हप्त्यात करील. निष्कासन व्यवस्थेची मालकी म.रा.वि.मंडळाकडे राहील तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती म.रा.वि.मंडळातर्फे केली जाईल.

**५) पोहोच रस्ते :-** शासन मान्य प्रकल्प अहवालाप्रमाणे महाऊर्जा पोहच रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करुन घेईल. यासाठी लागणारा १०० टक्के खर्च हरित ऊर्जा निधीमधून भार्गावला जाईल.

**६) विद्युत शुल्क :-** नवीन धोरणांतर्गत राज्यात आस्थापित होणा-या पवन ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणा-या वीजेचा वापर उद्योगांनी निजी वापरासाठी केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या ५ वर्षाकरिता विद्युत शुल्क आकारले जाणार नाही.

**७) सहकार क्षेत्रास प्रोत्साहन :-** सहकारी संस्थांनी पवन ऊर्जा प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित केल्यास त्यांना हरित ऊर्जा निधीमधून ११ टक्के भाग भांडवल अनुदान म्हणून देण्यात येईल.

**८) लेटर ऑफ क्रेडिट :-** प्रवर्तकाने म.रा.वि.मंडळास वीज विक्री केल्यास त्यांचे पैसे विहित मुदतीत मिळावेत म्हणून म.रा.वि.मंडळ प्रवर्तकाला लेटर ऑफ क्रेडिट उपलब्ध करुन देईल. लेटर ऑफ क्रेडिटची सुविधा देऊन ते सुरु (ओपन) करण्याचा सर्व खर्च म. रा. वि. मंडळास महाऊर्जामार्फत हरित ऊर्जा निधीतून १०० टक्के अनुदान म्हणून दिला जाईल.

**९) इतर बाबी :-** वरील सर्व बाबी व्यतिरिक्त पवन ऊर्जा प्रकल्पास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी घेतलेले सर्व निर्णय लागू राहतील. जसे वीजदर व तत्संबंधी बाबी, ऊर्जा खरेदी करार व तत्संबंधी बाबी तसेच निजी वापराकरीता किंवा विजेची विक्री तिस-या घटकास केल्यास त्यास लागू होणा-या बँकींग, व्हिलिंग, पारेषण व वितरण हानी आणि तत्संबंधी बाबी.

**१०) इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या अंतर्गत तरतुदी :-** इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या तरतुदीअंतर्गत अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतातून विद्युत निर्मितीस प्रोत्साहन देणे, निर्मित वीज ग्रीडशी जोडण्यासंबंधी योग्य उपाययोजना करणे, विजेची विक्री कोणासही करणे व अशा स्त्रोतातून निर्मित वीज, वितरण परवानेधारकांनी किती प्रमाणात खरेदी करावी या बाबी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यकक्षेत आहेत. आयोगाने वेळोवेळी दिलेले निर्णय संबंधितांना लागू राहतील.

११) या पवन ऊर्जा धोरणांतगत कार्यान्वित करावयाच्या पवन ऊर्जा प्रकल्पांबाबतची तपशीलवार कार्यपध्दती स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

श्यामकुल

(अरुण श्यामकुल)
विशेष कार्य अधिकारी

प्रति,

१) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स, त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे-४११ ००६.

२) अध्यक्ष, म.रा.वि.मंडळ, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रत,

१) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.

२) प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई.

४) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.

५) मुख्य अभियंता (विद्युत) महाराष्ट्र शासन, सां.बां.वि. प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई-७१.

६) तांत्रिक संचालक (सांनि), म.रा.वि.मंडळ, प्रकाशगड, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१.

७) तांत्रिक संचालक (वितरण), म.रा.वि.मंडळ, प्रकाशगड, वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.

८) व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम, मुंबई.

९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मरोळ,अंधेरी (पूर्व),मुंबई-९३.

१०) निवड नस्ती (ऊर्जा-७) उ. ऊ. व का. विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.